बीड । मंगळवार
१७.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २५०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●dailymarathwadapatra2021@gmail.com ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post:Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Mo. 9822152955




# आरोपी 'बाप तो बाप रहेगा' चे पोस्टर झळकावतोय, महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे का ? : अंबादास दानवे

## संतोष देशमुख हत्याकांडाचा वाल्मिक कराड मास्टरमाइंड: आ. संदीप क्षीरसागर







### ● अंबादास दानवे काय म्हणाले ? ●

बीडमध्ये जे झालं ते गंभीर आहे. त्या प्रकरणात वॉचमनने एट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करा अशी मागणी केली आहे. पोलीस सहकार्य करण्याऐवजी आरोपींना मदत करत आहेत. आरोपी बाहेर फिरत आहेत. ज्या आरोपीने खून केला त्याचे पोस्टर लावले जातात. बाप तो बाप है म्हंटलं जातंय. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा एक तालुका अध्यक्ष यात आहे. तीन गुन्हेगार राजकीय पक्षाशी संबंधित आहेत. एक मंत्री आहेत त्यांच्या जवळची व्यक्ती वाल्मिक अण्णा नावाची ती व्यक्ती आहे. त्या व्यक्तीने या प्रकरणात फोन केले आहेत.

**नागपूर । प्रतिनिधी**

बीड जिल्हा तील केज तालुक्यातील मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करत खून केल्याची घटना उघडकीस आली आणि महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. या घटनेवर संदीप क्षीरसागर यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच आपली भूमिका मांडली आहे.

अतिशय दुर्दैवी घटना आमच्या बीड जिल्ह्यात घडली असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. संदीप क्षीरसागर म्हणाले, अतिशय दुर्दैवी घटना घडलेली आहे. सर्व महाराष्ट्र या घटनेचा साक्षीदार आहे. मी त्या कुटुंबाला भेटायला गेल्यानंतर त्या गावामध्ये गेल्यानंतर संतोष देशमुख यांच्या कुटुंबाशी बोललो तसेच पूर्ण परिसरातील लोकांशी बोललो. अतिशय दहशतीचे वातावरण या गावात आहे. सर्वात महत्त्वाचा विषय जे काही गुन्हे दाखल झाले आहेत या संदर्भातली, यामधले काही गुन्हेगारांना तर अटकच झालेली नाही. ज्यांना अटक झाली ते काही प्रमुख गुन्हेगार नाहीत. यांचा मास्टरमाइंड वाल्मिक कराड आहे. आणि सगळ्यात प्रमुख त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. म्हणजे तपासची अशी दिशाभूल केली जात असल्याचे क्षीरसागर म्हणाले आहेत. पुढे बोलताना संदीप क्षीरसागर म्हणाले, खंडणीचा गुन्हा ज्यांनी दाखल केला. माझ्याकडे पुरावे आहेत की त्या पुरव्यांमध्ये ज्या विंडमिलच्या अधिकाऱ्यांनी जे खंडणीचे गुन्हे दाखल केले आहेत त्यांच्या ऑफिसमध्ये वाल्मिक कराड यांचे सत्कार करतानाचे फोटो आहेत. माझी प्रमुख मागणी आहे आज ८ ते ९ दिवस उलटले आहेत पूर्ण जिल्हा हा संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी बघत आहे.

पुढे रामकृष्ण बांगर यांच्याविषयी बोलताना संदीप क्षीरसागर म्हणाले, रामकृष्ण बांगर एक शिक्षक संस्थानिक आहेत. त्यांच्या मुलावर कलम ३०७ दाखल करण्यात आले आहे. त्यांची सुद्धा जागा या वाल्मिक कराडला बळकवायची आहे म्हणून त्यांच्या मुलांवर ३०७ दाखल केला. त्यानंतर देखील ऐकले नाही म्हणल्यावर आई वडील आणि मुलगा यांच्यावर एट्रोसिटी दाखल करण्यात आला. मुलगा आणि त्याच्या आईकडे सीसीटीव्ही फुटेज आहेत ज्यात दिसते की मुलगा इथे नाहीये. म्हणजे हे ३०७ दाखल करणे अशा पद्धतीचे काम इथे सुरू आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर



### ▸ 'सीआयडी'चे पथक मस्साजोगमध्ये दाखल, देशमुख कुटुंबियांची घेतली भेट

सीआयडीचे पथक मस्साजोगमध्ये दाखल झाले आहे. सीआयडीचे आयपीएस अधिकारी सचिन पाटील यांनी पीडित कुटुंबियांची भेट घेतली आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला सात दिवस पूर्ण होत आहेत. सीआयडीचे पथक दोन दिवसापासून बीड जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (ता.१६) विधिमंडळ अधिवेशनात संतोष देशमुख खून प्रकरणाचा तपास 'सीआयडी'कडे दिल्याची माहिती दिली होती. तसेच यावर 'एसआयटी' समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगितले होते. या खून प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप केला जात आहे.





*नागपूर येथे संपन्न झालेल्या शपथविधी समारंभात ना.धनंजय मुंडे व ना.पंकजाताई मुंडे यांचा शपथविधी संपन्न झाला, त्याची क्षणचित्रे...*

## आरपीआयच्या वतीने परभणी घटनेच्या निषेधार्थ तलवाडा कडकडीत बंद: संतोष सूर्यवंशी यांना वाहिली श्रद्धांजली

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले गट )च्या वतीने परभणी जिल्ह्यात संविधान प्रतीची बिटबना जो प्रकार झाला होता त्या निषेधार्थ तलवाडा या ठिकाणी सर्व समाज बांधवांच्या वतीने जुन्या बस स्टँन्ड भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कुर्ती पुतळ्यात घडलेल्या निंदनीय घटनेचा निषेध करण्यात आला



याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या आठवड्यात परभणी जिल्हा या ठिकाणी एका व्यक्तीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतीच्या प्रतिमेची तोडफोड करण्यात आलेली होती हे सर्व घटना समाज बांधवांच्या नजर किस आल्यामुळे तात्काळ त्या व्यक्तीला भीमसैनिकांनी चांगला चोप दिला याचे पडसाद राज्यभर उमटत असताना भीमसैनिक संतोष सूर्यवंशी गुन्हा दाखल करत असताना कारागृहातच त्यांचा मृत्यू झाला दिनांक

▶▶ उर्वरित पान २ वर

## शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचें पुनर्वसन व्हावे

**बीड । प्रतिनिधी**

परभणी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानामधील प्रस्तावनेतीच्या प्रतीकृतीची विटंबना करणा-या समाजकंटकाच्या निषेधार्थ राज्यात तसेच देशभरात सनदशीर मार्गाने आंदोलने सुरु असताना.

परभणी येथील आंदोलकांना स्थानिक पोलीसांच्याकडून निर्दयपणे बेदम मारहाण करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.शिवाय बंद घरे,घरासमोर पार्किंग केलेली वहाने पोलीस कर्मचारीच फोडीत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.याचा आम्ही निषेध करीत आहोत. याच आंदोलनातील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी या ङ्खङ्घ च्या विद्यार्थ्यांस पोलीसांनी निर्दयपणे बेदम मारहाण करुन अटक केली न्यायालयीन कोठडीत असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यृ झाला या मृत्यूस पोलीसच जबाबदार असुन अशा पोलासांचा शोध घेऊन त्यांचेवर सेवेतून बडतर्फीची कारवाई करावी. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटूंबीयातील सदस्यास

▶▶ उर्वरित पान २ वर



# झाकिर हुसेन यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला ‘इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस’ विकार काय आहे ?

**प्रामुख्याने ५० वर्षांवरील व्यक्तींमध्ये इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस हा आजार आढळून येतो. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आहेत. काही प्रकरणांमध्ये आनुवांशिकतेमुळे हा आजार आढळून येतो. सध्या धूम्रपान करणारे आणि आधी धूम्रपान करीत असलेले अशा दोघांनाही या आजाराचा धोका असतो.**




तबला उस्ताद झाकिर यांचे रविवारी अमेरिकेत सॅनफ्रान्सिस्को येथे निधन झाले. त्यांचा मृत्यू इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस या आजारामुळे झाला आहे. त्यामुळे या आजाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. हा फुप्फुसाचा आजार असून, तो फुप्फुसांच्या ऊतींवर गंभीर परिणाम करतो. या आजाराची तीव्रता कमी करण्यासाठी औषधोपचार आहेत; मात्र, कोणताही कायमस्वरूपी उपाय सध्या तरी उपलब्ध नाही. या आजाराचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे त्याला इडिओपॅथिक म्हणजेच मूळ माहिती नसलेला आजार असे म्हटले जाते. संशोधक या आजाराचे मूळ अद्याप शोधत आहेत.

### ● आजारात नेमके काय घडते ?

फुप्फुसाशी निगडित इतर आजारांपेक्षा हा आजार वेगळा आहे. यात फुप्फुसातील हवेच्या छोट्या आकाराच्या पिशव्यांभोवतीच्या इंटरस्टिटीअम ऊतींना हा आजार लक्ष्य करतो. यामुळे रक्तात ऑक्सिजन मिसळण्याची प्रक्रिया अवघड बनते. हवेतील धूळ, धूर अथवा संसर्गामुळे फुप्फुसाला इजा होते. त्या वेळी शरीर आपोआप इजा झालेल्या ऊती दुरुस्त करते. इतर आजारांमध्ये ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होते. मात्र, या आजारात ही प्रक्रिया अनियमित असते. शरीर कोलॅजन आणि इतर फायब्रस पदार्थ जास्त प्रमाणात तयार करते. यातून फुप्फुसाची झालेली हानी भरून निघण्याऐवजी ती आणखी वाढते. हे सर्व नेमके कसे घडते, हे अद्याप उलगडलेले नाही. संशोधक याचीही नेमकी प्रक्रिया शोधत आहेत.

### ● लक्षणे कोणती ?

इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस या आजारात फुप्फुसातील ऊतींना इजा झाल्याने त्यातून फुप्फुस जाड आणि कठीण बनते. यामुळे त्याची विस्तारण्याची आणि ऑक्सिजन आतमध्ये घेण्याची क्षमता कमी होते. त्यातून रुग्णाला श्वसनास त्रास, थकवा, कोरडा खोकला, वजन कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. आजार झाल्यानंतर हळूहळू शरीरातील ऑक्सिजनची पातळी खालावते. यामुळे उच्च रक्तदाब, हृदयक्रिया बंद पडणे अथवा श्वसन क्रिया बंद पडणे असे गंभीर दुष्परिणाम उद्भवतात.

### ● सर्वाधिक धोका कोणाला ?

प्रामुख्याने ५० वर्षांवरील व्यक्तींमध्ये इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस हा आजार आढळून येतो. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आहेत. काही प्रकरणांमध्ये आनुवांशिकतेमुळे हा आजार आढळून येतो. सध्या धूम्रपान करणारे आणि आधी धूम्रपान करीत असलेले अशा दोघांनाही या आजाराचा धोका असतो. धूळ, लाकडाचा भुसा अथवा धातूच्या सूक्ष्म कणांच्या जास्त काळ संपर्कात असलेल्या व्यक्तींना हा आजार होण्याची शक्यता जास्त असते.

### ● निदान कसे होते ?

उच्च क्षमतेच्या सीटी स्कॅनच्या साहाय्याने इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस या आजाराचे निदान होते. याचबरोबर श्वसनाशी निगडित चाचण्या आणि काही वेळा फुप्फुसाच्या बायोप्सी चाचणीतून निदान करता येते. फुप्फुसाशी निगडित इतर आजार रुग्णाला नाहीत, याची खातरजमा डॉक्टरांना सर्वप्रथम निदान करताना करावी लागते.

### ● उपचार कसे होतात ?

अँटीफ्रायब्रोटिक औषधांचा वापर इडिओपॅथिक पल्मनरी फायब्रॉसिस या आजाराच्या रुग्णांसाठी केला जातो. त्यात पिरफेनायडोन आणि निन्टेडानिब ही औषधे दिली जातात. या औषधांमुळे आजाराचा वेग मंदावतो. याचबरोबर ऑक्सिजन थेरपी आणि फुप्फुसाचा व्यायाम आदी उपचारही केले जातात. रुग्णाची प्रकृती खूपच खालावली असेल आणि फुप्फुसाची खूपच हानी झाली असेल, तर फुप्फुस प्रत्यारोपणाशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे वेळीच निदान आणि त्या अनुषंगाने उपचार यामुळे या आजाराचा धोका कमी करता येतो.

# इंजीनियर झालेल्या तरुणांसाठी नोकरीची मोठी संधी

## NCL मध्ये विविध पदासांठी भरती प्रक्रिया सुरु, कसा कराल अर्ज?



इंजीनियर झालेल्या तरुणांसाठी नोकरीची मोठी संधी निर्माण झाली आहे. नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन ( NLC) ने विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु केली आहे. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. ज्यासाठी उमेदवार अधिकृत साइटला भेट देऊन अर्ज करू शकतात. इच्छुक आणि पात्र उमेदवार 15 जानेवारीपर्यंत अर्ज करू शकतात. नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन (NLC) भारतातील नवरत्न कंपन्यांपैकी एक आहे. ग्रॅज्युएट एक्झिक्युटिव्ह ट्रेनी (GET) या पदांसाठी भरतीसाठी अधिसूचना जारी केली आहे. या भरतीअंतर्गत विविध तांत्रिक क्षेत्रातील एकूण 167 पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत.

कोणत्या पदांसाठी किती जागा?
मेकॅनिकल : 84 पदे
इलेक्ट्रिकल: 48 पदे
सिव्हिल: 25 पदे
नियंत्रण आणि उपकरणे: 10 पदे

अर्जाची पात्रता आणि वयोमर्यादा
या पदांसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांना संबंधित क्षेत्रातील अभियांत्रिकी पदवी असणे अनिवार्य आहे. या भरतीसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा 30 वर्षे निश्चित करण्यात आली आहे. तर OBC (NCL) प्रवर्गाला 3 वर्षांची व SC/ST प्रवर्गाला 5 वर्षांची वयोमर्यादा सवलत दिली जाते. 1 डिसेंबर 2024 रोजी वयाची गणना केली जाईल.

अर्ज करण्याची फी किती?
अनारक्षित/ओबीसी (NCL)/EWS साठी: 854 रुपये
SC/ST/PWD/माजी सैनिकांसाठी: 354 रुपये

कसा कराल अर्ज?
अर्ज करण्यासाठी, उमेदवारांना NLC च्या अधिकृत वेबसाइट www.nlcindia.in ला भेट द्यावी लागेल. येथे 'करिअर' विभागात जा आणि "ग्रॅज्युएट एक्झिक्युटिव्ह ट्रेनींची भर्ती (GETs)" या लिंकवर क्लिक करा. यानंतर, उमेदवारांना प्रथम नोंदणी करावी लागेल आणि नंतर इतर तपशील भरून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. शेवटी, विहित शुल्क भरल्यानंतर, फॉर्म सबमिट करा आणि त्याची प्रिंटआउट सुरक्षित ठेवा. दरम्यान, नोकरीच्या शोधात असणाऱ्या इंजीनियरसाठी ही मोठी संधी आहे. www.nlcindia.in या साईटवर सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

NLC भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील
NLC इंडिया लिमिटेड ( NLC ) ही भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील एक केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आहे. दक्षिण भारतातील तामिळनाडू राज्यातील नेवेली येथे आणि राजस्थान राज्यातील बिकानेर जिल्ह्यातील बारसिंगसर इथं ओपनकास्ट खाणींमधून दरवर्षी सुमारे 30 दशलक्ष टन लिग्नाइटचे उत्पादन होते. वीज निर्मितीसाठी 3640 मेगावॅट स्थापित क्षमतेच्या पिटहेडथर्मल पावर स्टेशनवर लिग्नाइटचा वापर केला जातो. त्याच्या संयुक्त उपक्रमामध्ये कोळशाचा वापर करून 1000 मेगावॅटचे थर्मल पॉवर स्टेशन आहे. अलीकडे, त्याने अक्षय ऊर्जा उत्पादनात विविधता आणली आहे.

# शाळांची बदलती स्नेहसंमेलने



सध्या शाळा आणि महाविद्यालयांची वार्षिक स्नेहसंमेलन सर्वत्र सुरु आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मुलांचे नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग यांसारखे कार्यक्रम यानिमित्ताने भरवले जातात. शिशुवर्गापासूनच्या मुलांना नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. प्रत्यक्ष कार्यक्रमाआधी महिनाभरापासून मुलांकडून कसून सराव करून घेतला जातो. बड्या खासगी शाळांकडून स्नेहसंमेलनासाठी वातानुकूलित शाही सभागृह आरक्षित केले जाते. संमेलनाला समस्त पालकांना निमंत्रित केले जाते. मुलांच्या वेशभूषेपासून सभागृहाच्या आरक्षणाचा आणि पाहुण्यांच्या चहा-पाण्याचा खर्चही बहुतेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या पालकांकड्न वसूल केला जातो. मुलांच्या शाळाप्रवेशासाठी लाखोंचे डोनेशन देणाऱ्या पालकांचीही याला हरकत नसते. आपली मुले पहिल्यांदा व्यासपीठावर नृत्य करणार या कल्पनेनेच गदगद झालेले पालक आपल्या पाल्याचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन जातीने उपस्थित राहतात. प्रत्यक्षात कार्यक्रम पाहताना एकसारखी वेशभूषा केलेल्या २५-३० मुलांच्या गराड्यात आपले बाळ ओळखताना पालकांचाही वेळ जातो. बाळाला केंद्रित करून बाळाचे नृत्य आपल्या मोबाईलमध्ये ध्वनिचित्रित करताना बिचाऱ्या पालकांनाही चांगलीच कसरत करावी लागते. हल्ली टीव्ही चॅनल्सवर चालणाऱ्या लहान मुलांच्या नृत्याच्या रिऍलिटी शोजचा परिणाम या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांवरसुद्धा सध्या पडू लागला आहे. आपल्याकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात बालगीते आणि बडबड गीतांचे भांडार असताना काही शाळांत दुसरी तिसरीच्या कोवळ्या मुलांना हिंदी चित्रपटातील रोमँटिक अथवा आयटम साँग्सवर नाचवले जाते. ज्या गाण्यातील शब्दांचा अर्थही मुलांना माहीत नसतो अशा गाण्यांवर मादक हालचाली आणि हातवारे करणाऱ्या या कोवळ्या मुलांच्या नृत्यावर हसावे कि रडावे हेही नेमके कळत नाही. विशेष म्हणजे उपस्थित पालकही अशा नृत्यांच्या सादरीकरणावर बेहद खुश होऊन शिट्या आणि टाळ्यांची बरसात करतात. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्नेहसंमेलनातून मुलांवर कुसंस्कार तर होत नाहीत ना याचे भान शाळा व्यवस्थापनाने राखायला हवे !

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

पान १ / ४ वरुन पुढे....

## आरोपी 'बाप तो बाप..

पुढे संदीप क्षीरसागर म्हणाले, इतक्या निर्दयीपणे त्यांनी संतोष देशमुखला मारले आहे. अक्षरशः त्याचे डोळे फोडले आहेत आणि कॉल रेकॉर्ड जर तुम्ही तपासले तर पूर्णपणे ते अँगल त्या वाल्मिक कराडकडे जाईल. पण का ही सरकार न्याय देण्यासाठी मागे सरकत आहे हा प्रश्न आमच्या सर्वांना पडला आहे. जिल्ह्यातले लोक आमच्याकडे फार आशेने बघत आहेत. त्यांनी आम्हाला आमदार म्हणून निवडून दिले. आम्ही संतोष देशमुख आणि रामकृष्ण बांगर यांना न्याय भेटल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असेही संदीप क्षीरसगर यावेळी म्हणाले आहेत.

## आरपीआयच्या वतीने...

१६/१२/२०२४ सोमवार रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट पक्षाच्यावतीने बंद पुकारण्यात आला यावेळी सर्व समाज बांधवांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पूर्ण कृती पुतळ्यापाशी येऊन निषेध नोंदवला यावेळी सरपंच विष्णू हाते, उपसरपंच आज्ु सौदागर, समता परिषदेचे बापू गाडेकर,आर पी आय युवा सर्कल प्रमुख सुमेध करडे, विनोद आठवले, रवी मरकड गणेश कचरे महाराज, डॉ सुरेश गाधले, आदींनी आपले मनोगत व्यक्त करुन निषेध नोदवला तर कार्यक्रमाला उपस्थिती म्हणून मा प. ऋषिकेश करडे, जीवन डोंगरे, मोहन डोंगरे, राहुल आठवले, अरुण डोंगरे, महेश मरकड, निखील करडे,अभिजित मरकड, पत्रकार अल्ताफ कुरैशी, आदीजन उपस्थित होते तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लहुजी साळवे क्रांती सेनेचे दादाराव रोकडे यांनी सूत्रसंचालन केले.

## शहीद भीमसैनिक...

शासकीय नोकरीत सामावून घेऊन पुनर्वसन करण्याची मागणी आंबेडकरी जनतेने केली आहे.तसेच त्यांच्या कुटूंबीयांना भरीव आर्थिक मदत करावी.या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करुन या मागील कटाचा मुख्य सूत्रधार कोण आहेत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आंबेडकरी जनता आणि सामजिक कार्यकर्ते तथा समदिप सामाजिक प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विष्णूबाळ झोडगे यांनी केली आहे.

## कॅबिनेटपासून राज्यमंत्रीपर्यंत....

**राज्यमंत्री**

१. माधुरी मिसाळ, २. आशिष जयस्वाल , ३. पंकज भोयर , ४. मेघना बोर्डीकर साकोरे , ५. इंद्रनील नाईक , ६. योगेश कदम

मंत्रिमंडळ सर्व समावेशक- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आज कॅबिनेटच्या बैठकीत आम्ही तिघांनी आपल्या मंत्र्यांना सांगितले आहे की परफॉर्मन्स ऑडिट केला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ज्यांना मंत्री म्हणून घेतले नाही, त्यांना पक्षाकडून वेगळी जबाबदारी दिली जाईल. भाजपमध्ये ज्यांना मंत्री केलं जात नाही, तेव्हा त्यांना पक्षाकडून काही वेगळी जबाबदारी देण्याचे निर्णय झालेले असतात.. मात्र जे मंत्री आज ड्रॉप झाले आहे त्याच्यामध्ये काही लोक परफॉर्मन्स न केल्यामुळे ड्रॉप झाले असतील असेही होऊ शकतं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. खातेवाटप संदर्भात आमच्यात चर्चा झाली आहे त्या संदर्भात स्पष्टता आहे पुढील दोन-तीन दिवसात खाते वाटप होईल.पालकमंत्र्यांसंदर्भात अद्याप आमची चर्चा झालेली नाही. अजून तो आमच्यासमोर विषय नाही, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी आपली भूमिका मांडली. मंत्रिमंडळ सर्व समावेशक आहे. सर्व समाजाला त्याच्यामध्ये संधी देण्याचा प्रयत्न केला आहे. महिला मंत्रींना आधीच्या तुलनेत खूप मोठ्या प्रमाणात संधी दिली आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी महायुतीच्या पत्रकार परिषदेत सांगितले.

## भुजबळ साहेबांना...

निर्माण झाला आहे त्यामुळे सन्मानपूर्वक भुजबळ साहेबांना मंत्रिमंडळात घ्यावे या मागणीसाठी माजलगाव पाथरी रोडवर आडगाव फाटा येथे सकाळी दहा वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे जिल्ह्यातील तमाम ओबीसी बांधवांनी या रास्ता रोको मध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले न्यायी आंदोलन यशस्वी करावे आसे आव्हान संतोष रासवे यांनी केले आहे

## आष्टीत स्टेट बँक...

द्यावा तसेच फरकाचे रक्कमेची किरायाची रक्कम प्रचलीत दराने अदा करावी अशी विनंती केली असता आपण आमचे जागेचा रिक्त ताबा देणेस टाळाटाळ करत आहात. आपले सदरचे कृत्य बेकायदेशीर असुन आपले व सबंधीत शाखाधिकाऱ्यांचे अशा स्वरूपाचे वर्तणुकीस

कंटाळुन आम्हास आमचे जीवन नकोसे झाले आहे. त्यामुळे आमचे विषयात नमुद जागेचा रिक्त ताबा मिळेपर्यंत व फरकाचे किरयाची रक्कम मिळेपर्यंत आम्ही दोघे भाऊ आष्टी येथील आपले श्याखेसमोर दिनांक १५/१२/२०२४ पासुन आमरण उपोषणास बसणार आहोत व त्या उपरही आपण आमचे विनंतीची दखल न घेतल्यास आम्हास आमचे जीवन संपवणेशिवाय पर्याय राहणार नाही, त्यानंतर होणारे परिणामांस आपण तसेच आपले आष्टी येथील बँकेचे शाखाधिकारी जबाबदार राहतील असा इशारा उपोषणकर्ते शेख हारूण शेख जाफर शेख युनूस शेख जाफर यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी,बीड पोलीस अधिक्षक,पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन,आष्टी लोकआयुक्त, लोकआयुक्त कार्यालय,मुंबई गव्हर्नर,रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई आ. सुरेश धस,तहसीलदार आष्टी यांना दिले आहेत.

## बीड जिल्ह्याची कायदा...

शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांत घडलेल्या घटना अत्यंत वाईट आहेत. मस्साजोग येथील सरपंच पती संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. परळी वैजनाथ येथील व्यापारी अमोल डूबे यांचे अपहरण करून त्यांना मारहाण करण्यात आली आणि खंडणी मागण्यात आली. जिल्ह्यात कोठे खून होत आहेत, कोठे गंभीर चोऱ्या, गोळीबार, खंडणी मागण्याचे प्रकार तर सर्रास होत आहेत. बीडच्या पोलीस यंत्रणेवर अशा घटनांमुळे वारंवार नकारात्मक टीका केल्या जात आहेत. पोलिस यंत्रणा राजकीय नेत्यांच्या हातचे बाहुले झाल्याचे आरोप केले जात आहेत. मागील पाच वर्षात या प्रकारांना खतपाणी घातल्या गेल्याचे वारंवार चर्चा केली जाते. जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले असून लोकशाही इथे नावालाच शिल्लक आहे की काय? अशी शंका निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील परिस्थिती पाहता इथे गुंडगिरी आणि दादागिरी पर्वाचा उदय झाल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. सर्वसामान्य जनतेचे जगणे निर्भय आणि सुसह्य व्हावे यादृष्टीने शासनाकडून उपाययोजना तातडीने केल्या जाणे आवश्यक आहे. राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. येथून मागे घडलेल्या गंभीर घटनांची सीबीआय चौकशी करावी आणि जे खरोखर दोषी आहेत त्यांना कठोर शिक्षा केली जावी अशी मागणी युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

कायद्याची जरब बसवणार कोण?-बीड जिल्ह्यात घडत असलेले प्रकार निंदनीय आणि अत्यंत धोकादायक आहेत. एका नावाजलेल्या जिल्ह्याची प्रतिमा यामुळे मलीन होऊ लागली आहे. जिल्ह्याची तुलना बिहार बरोबर केली जात असून, गुन्हेगारीचे इथे कळस गाठला आहे. कायद्याच्या दृष्टीने जे गुन्हेगार असतील त्यांना कठोर शिक्षा झाली तर अशा घटनांना पायबंद होईल. गुन्हेगारीला अजिबात राजाश्रय भेटता कामा नये. शासन प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी जर येथील कायदा सुव्यवस्था सुध्रववण्यासाठी प्रयत्न केले नाहीत तर भविष्यकाळातील चित्र गंभीर होईल. त्यामुळे योग्य वेळी योग्य त्या उपाययोजना करून कायद्याची जरब बसवणे गरजेचे आहे, मात्र यासाठी पुढाकार कोण घेणार? असा सवाल निर्माण होत असल्याचेही युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे.

# संविधान प्रेमी निरपराध सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युची सिआयडी मार्फत चौकशी करा

## समस्त शिव फुले शाहु आंबेडकर अनुयायींची मागणी ; सर्व पक्षीय संघटनेची शांततेत माजलगाव बंदची हाक !

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक १० डिसेंबर रोजी परभणी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान शिल्पाची जातीयव्देश पसरविण्याचा उद्देश समोर ठेवून तोडफोड केली त्याचा परिणाम परभणी शहरातील संविधान प्रेमी यूवक आक्रमक झाल्याने कांही युवकांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते त्यातच सोमनाथ सुर्यवंशी या युवकाचा कारागृहात मृत्यु झाल्याची धक्कादायक घटना घडली असुन या घटनेचा निषेध व्यक्त करत दिनांक १६ डिसेंबर रोजी अवघ महाराष्ट्र बंद ची हाक डॉ बाबासाहेब आंबेडकर अनुयायांनी दिली आहे. तरि म ाजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी शांततेचे सहकार्य करावे असे आवाहन शिव शाहु फुले आंबेडकर अनुयायी माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.



परभणी येथील न्यायालयीन कोठडीत असलेल्या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे मृत तरुणाचे नाव सोमनाथ सूर्यवंशी वय ३५ वर्ष असे असून त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकारामुळे परभणी शहरात पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण झाले असून घटनेची गंभीर दखल घेत नांदेड परिक्षेत्राचे आयजी शाहजी उमाप पुन्हा परभणीत दाखल झाले आहेत. सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत सध्या काहीही स्पष्ट नाही. या तरुणाचे न्यायाधीशांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात येणार आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. परभणी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. आंदोलकांचा मोठा जमाव, दगडफेक, जाळपोळ, पोलिसांचा आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज, जमावबंदी, इंटरनेट सेवा बंद अशा ताणलेल्या घटनांनंतर जवळपास ५० जणांना ताब्यात घेण्यात आले होते. या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एकाचा कारागृहातच मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे. सोमनाथ सुर्यवंशी असे त्या ३५ वर्षीय मृत तरुणाचे नाव आहे. कारागृहातच या तरुणाचा मृत्यू झाल्याने शहरात पुन्हा अस्वस्थता व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. परभणीत झालेल्या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा कारागहातच मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, सोमनाथ सुर्यवंशी असे ३५ वर्षीय मयत तरुणाचे नाव असून जिल्हा सामान्य रुग्णालयात आणल्यानंतर डॉक्टरांनी त्या तरुणास मृत घोषित केले. या घटनेने परभणीत पुन्हा एकदा तणावाचं वातावरण निर्माण झालंय. याच अनुषंगाने माजलगाव बंदची हाक आंबेडकरी जनतेच्या वतीने देण्यात आलेली आहे या आशयाचे निवेदन पोलीस प्रशासनाला समस्त शिव फूले शाहु आंबेडकरी अनुयायी व कार्यकर्त्यांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशनला दिले आहे या बंदमध्ये सर्वपक्षीय सर्व संघटना सहभागी होणार असून हा बंद शांततेत पाळण्यात यावा व सर्व व्यापारी बांधवांनी या बंदला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.



*आज महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात नामदार धनंजयजी मुंडे साहेब व नामदार पंकजाताई मुंडे यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकाऱ्यांनी बीड शहरात ठीक ठिकाणी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.*

## अखेर अनाधिकृत बॅनर प्रकरणी बीड नगरपालिके कडुन २१ जणांविरोधात गुन्हा दाखल ; कारवाईत सातत्य हवे : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात राजकीय नेते, कार्यकर्ते, व्यावसायिक आदिंनी आपापल्या वेगवेगळ्या जाहिरातीचे अनाधिकृत बॅनर लावून सुंदर शहराला विद्रूप केले होते.तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात लावण्यात आलेल्या बॅनर मुळे वाहतुकीस अडथळा व अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. याविरोधात शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी सहका-यांसमवेत दि.२ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने केली होती. मागील काही वर्षांपासून शहरात विनापरवाना बॅनर लावण्याचा पायंडाच पडला होता. नेत्यांच्या




निवडी, शहरात स्वागत ,उत्सव, वाढदिवस आदी कार्यक्रमांच्या शुभेच्छांचे बॅनर लावले जात होते. अनाधिकृत बॅनर हटवावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते वारंवार निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून नगरपालिका प्रशासनाकडे कारवाईची मागणी करत होते.परंतु ठोस कारवाई करण्यात येत नसे आंदोलनानंतर बॅनर काढण्याचे नाटक करण्यात येई आणि दुस-या दिवशी पुन्हा बॅनर लावलेले दिसत असत.अखेर नगर पालिकेने कठोर पावले उचलत दि.१२ गुरूवार रोजी एकाच दिवशी ३ पोलिस ठाण्यात तब्बल २१ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

स्वच्छता निरीक्षक शशिकांत जोगदंड यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सुदर्शन सुभाष बांगर,उमेश शहादेव फड,यादव चव्हाण, संकेत जाधव,सुमित उजगरे, जालिंदर हिरवे,दिपक चांदणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.सुनिल काळकुटे यांच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलिस ठाण्यात संकेत जाधव,रोहन गायकवाड, विलास जोगदंड यांच्या विरोधात तर भागवत जाधव यांच्या फिर्यादीवरून संकेत जाधव,दत्ता पगळ,अक्षय चांदणे, सुमित उजगरे,पंकज खुपसे,अक्षय चांदणे,अजय सुरवसे, राहुल इंगळे, जालिंदर हिरवे,दीपक चांदणे बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आवाहन करून बॅनर जप्तीची कारवाई करूनही पुन्हा अनाधिकृत बॅनर लावणारांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या - निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड-

विना परवाना बॅनर लाऊ नये असे आवाहन करण्यात आले होते.पहिल्यांदा बॅनर जप्तीची कारवाई करण्यात आली होती. परंतु त्यानंतरही काही लोकांनी विना परवाना बॅनर लाऊन शहराचे विद्रुपीकरण करणे सुरूच ठेवले होते.त्यामुळे सर्व स्वच्छता निरीक्षकांना सुचना करून गुन्हे दाखल करण्याच्या सुचना दिल्या. नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी केले आहे.

## तबल्याचा ताल हरपला झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली



**नागपूर । प्रतिनिधी**

प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने सबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका सम ेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या. महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले. तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबला क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली. तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वरमंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली.

## बेलगाव येथे रेणुकाई देवीची यात्रा संपन्न

### निसर्गरम्य वातावरणात भव्य कुस्त्यांचा आखाडा ;भाविकांची दर्शनासाठी मांदियाळी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील जागृत देवस्थान असलेले आराध्य दैवत श्री रेणुकाई मातेचा पौर्णिमेला दत्तजयंती दिवशी यात्रा मोठया उत्साहात साजरी झाली. तीन दिवस हा यात्रा महोत्सव चालतो.पहिल्या दिवशी विधीवत पौर्णिमेदिवशी देवीची पालखी छबिना मिरवणूक,ऑर्केस्ट्रा, दुसऱ्या दिवशी भव्य मल्लाचा हंगाम भरला या हंगामाला महाराष्ट्रातुन नामांकित मल्ल हजेरी लावली होती.हा हंगाम व यात्रा बेलगाव परिसरातील अठेगावपुठ्यात प्रसिध्द आहे.तिसऱ्या दिवशी यात्रा गावात भरते.यात्रेच्या दरम्यान देवीचा परिसर भाविक भक्तांच्या गर्दीने गजबजून केला होता. यावर्षी रेणुकाईमाता देवस्थानला ब दर्जा प्राप्त झाल्याने आणि माजी राज्यमंत्री सुरेश आण्णा धस यांच्या विशेष प्रयत्नाने ४ कोटी ९० लक्ष रुपयांचा भरघोस निधी मिळाल्याने देवस्थान परिसरात विविध



विकास कामे प्रगतीपथावर असून देवस्थानचा कायापालट पाहायला मिळाला असल्याने भाविकांनी यावेळी होत असलेल्या विकास कामाबद्दल समाधान व्यक्त केले. देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक जागृत पीठ म्हणजे माहूरची श्री रेणुकामाता तिचेच उपपीठ म्हणून बेलगावच्या रेणुकादेवीचे ओळख आहे.महाराष्ट्रातील व बेलगाव ग्रामस्तांची ही कुलदेवता आहे. रेणुका देवीला यात्रेनिमित्त विशेष साज,श्रृंगार चढवला जातो. सोन्याचे दागिणे आणि अलंकार देवीला चढविण्यात आले होते. दागिण्यांनी सजलेल्या रेणुका देवीचं नयन मनोहरी रुप प्रत्यक्ष डोळ्याने पाहण्यासारखे होते.

## माजलगाव मतदार संघाच्या पत्रकारितेतील भिष्माचार्य उमेश काका मोगरेकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव मतदार संघातील पत्रकारितेत संपुर्ण विषयांची सखोल माहिती असणारे अभ्यासक पत्रकार म्हणजे उमेश काका मोगरेकर यांचे नाव पुढे येते.उमेश काका गेल्या तीन दशकांपेक्षा जास्त काळापासून पत्रकारितेत सक्रिय असुन, ते प्रथम झुंजार नेताचे माजलगाव तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते. ते आजही असुन, यापुढे ही राहणार आहेत. त्यांनी झुंजार नेता शिवाय इतर कुठले वर्तमानपत्रात



काम केले नाही.हे वैशिष्ट्य आहे. तर झुंजार नेता परिवाराचा ही त्यांच्यावर गाढ विश्वास असुन, झुंजार नेता दैनिक परिवाराचे लाडके पत्रकार आहेत.उमेश काका ही झुंजार नेता खुप प्रेम करतात. तर संपादक अजित दादा वरपे साहेब यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. त्यांची पत्रकारिता अभ्यास पुर्ण तर आहेच परंतु कुठलाही सामाजिक प्रश्न हाती घेतला तर बातम्यांच्या माध्यम ातुन त्याचा पाठपुरावा करत तो मार्गी लावण्यास ते कायम प्रयत्नशील असतात. तर राजकीय बाबतीत तर ते कधीच कोणत्याही एका पक्षाची बाजु घेत नाहीत. जे सत्य आहे ते छापण्याची धमक उमेश काका मोगरेकर यांच्यात आहे.एखाद्या प्रश्ना बाबतीत कुणी दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर तो झुगारण्याची ताकद उमेश काका यांच्यात नेहमीच पाहावयास मिळाली.त्यांची पत्रकारिता इतर पत्रकार व नवोदित पत्रकारांना मार्गदर्शक आहे.उमेश काका कुणालाही सल्ला देताना चुकीचा सल्ला कधिच देत नाहीत. योग्य असेल तोच सल्ला देतात. मग समोरच्या तो पटो किंवा न पटो.ते एक रोखठोक व बेधडक पत्रकार असुन, त्यांच्या लेखणीने अनेक मातब्बरांची झोप उडते. त्यांच्या बातमीची अनेक जण धास्ती घेतात. माजलगाव मतदार संघाच्या राजकीय वातावरणात त्यांना वजा करून कुणीही राजकारण करू शकत नाही. ही वास्तव परिस्थिती आहे.ते तेवढे प्रेमळ स्वभावाचे आहेत. त्यांच्या संपर्कात आलेली व्यक्ती कधीच त्यांच्या पासुन दुर जात नाही. हे मोठे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्यांच्या अवतीभवती नेहमीच लोकांची गर्दी असते. अशा या सर्व समावेशक पत्रकार, आमचे मार्गदर्शक, दिशादर्शक मा.उमेश काका मोगरेकर यांना वाढदिवसानिमित्त मन:पुर्वक खुप खुप हार्दिक शुभेच्छा.


### मा. अॅड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज अॅक्ट 2002 व अब्रिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 11/12/2024

अर्जदार : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 687/2024, जाधव दिलीप भिमराव रा. नांदुरघाट ता. केज जि. बीड
2) लवाद अर्ज क्र. 688/2024 व 689/2024, जाधव मनोहर भिमराव रा. नांदुरघाट ता. केज जि. बीड
3) लवाद अर्ज क्र. 690/2024 ते 694/2024, पुनम मनोहर जाधव रा. नांदुरघाट ता. केज जि. बीड
4) लवाद अर्ज क्र. 695/2024 ते 701/2024, मंजुश्री हनुमंत कोकाटे रा. आडस ता. केज जि. बीड
5) लवाद अर्ज क्र. 702/2024 ते 704/2024, गणेश महादेव जगताप रा. पालसिंगण, चौसाळा ता. जि. बीड
6) लवाद अर्ज क्र. 705/2024 व 706/2024, लाखे प्रविण दिलीपराव रा. मु. खोडस पो. आडस ता. धारूर जि. बीड
7) लवाद अर्ज क्र. 709/2024 1) जाधवर सिद्धेश वसंतराव रा. गणपती मंदिर जवळ, जुना मोंढा, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड
8) क्र.710 ते 712/2024, लावंड शिवाजी रामराव 2) सोनवणे किशोर शिवाजी 3) लावंड जयश्री शिवाजी रा. कल्यान नगर ता. माजलगाव
9) लवाद अर्ज क्र. 713/2024 1) शिंदे प्रकाश सुमंतराव रा. शुभ मंगल मल्टीस्टेट समोर, जुना मोंढा, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड 2) मोरे नरहरी दादाराव 3) उपाद्ये पद्माकर आनंतराव रा. दोघे. पात्रुड ता. माजलगाव जि. बीड
10) क्र. 715/2024 1) साळवे प्रमोद काशिनाथराव रा. केसापुरी, पो. फुले पिंपळगाव ता. माजलगाव 2) वावळे प्रकाश दत्तात्रय रा. प्लॉट नं. 24, नागोबा मंदिर, परतुर ता. परतुर जि. जालना 3) खोपे दयानंद उत्तम रा. साई नगर, नवीन वसाहत, भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड
11) क्र. 716/2024 1) गायकवाड लहू तुकाराम रा. मोगरेकर फर्शी कारखाना बाजुला, चिंचगव्हाण ता. माजलगाव जि. बीड 2) सौंदरमल रमाकांत गंगाराम रा. नागझरी, पुनंदगांव ता. माजलगाव 3) गायकवाड शशिकांत विठोबा रा. भिमनगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड
12)क्र.717/2024 सातपुते विष्णु लिंबाजी रा. साळेगाव पो. हिवरा गोवर्धन ता. माजलगाव खान असदुल्ला इनायत यांच्या कर्जाला जामीनदार
13) लवाद अर्ज क्र. 719/2024 1) भास्कर गणपतराव हांगे रा. हालगे गल्ली, परळी वै ता. परळी जि. बीड
14) लवाद अर्ज क्र. 720/2024 1) पवार बाबु शंकरराव रा. इंदिरा नगर, लेंडेवाडी ता. परळी जि. बीड 2) चव्हाण लता रामचंद्र रा. स्वाती नगर, परळी वै. ता. परळी जि. बीड 3) जाधव सुगंध दुधा रा. लेंडेवाडी ता. परळी जि.बीड
15) लवाद अर्ज क्र. 721/2024 1) पवार सुखदेव रमेश रा. धारावती तांडा पो. दादाहारी वडगांव ता. जि. बीड 2) सिरसट वैजनाथ राजाराम रा. शिवाजी नगर, परळी ता. परळी जि. बीड 3) सुदाम शिवराम जाधव रा. पोखर्णी वा तांडा, पोखर्णी वाळक्या, परभणी ता. जि. परभणी
16)722/2024 1) वानखडे अभिमन्यु समाधान रा. दत्ता धाम, परिसर, अंबानगर, परभणी 2) पठाण ताजखान गुलाबखान, रा. गौतम नगर, गंगाखेड3)बिल्लापत्ते गजानन भिमराव रा. संत गंगाबाई नगर, गंगाखेड ता. गंगाखेड दुसरा पत्ता : शारदा विद्यामंदिर केंद्र, ता. गंगाखेड परभणी
17) लवाद अर्ज क्र. 723/2024 1) अनिता गणेश चव्हाण रा. देशमुख गल्ली, गणेश पार, परळी ता. परळी जि. बीड 2) उत्तम उमाजी राठोड रा. वसंत नगर तांडा, वसंत नगर, परळी ता. परळी जि. बीड 3) बाबु शंकर पवार रा. इंदिरा नगर, लेंडेवाडी ता. परळी जि. बीड
18) लवाद अर्ज क्र. 724/2024 1) विष्णु लिंबाजी सातपुते रा. साळेगांव पो. हिवरा गोवर्धन ता. माजलगाव जि. बीड 2) रोडे मिथुन धोंडिराम रा. भिमनगर, परळी ता. परळी जि. बीड 3) रोहीत प्रमोद काळे रा. माधवबाग, परळी ता. परळी जि. बीड
19) लवाद अर्ज क्र. 725/2024 1) महारुद्र तुकाराम बिडगर रा. कोद्री, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी 2) श्रीहरी महारुद्र मुंडे रा. संत जनाबाई नगर, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी 3) गजानन भिमराव बिलापट्टे रा. डोंगर जावळ, कोद्री ता. गंगाखेड जि. परभणी
20) लवाद अर्ज क्र. 726/2024 1) भानुदास रामचंद्र चव्हाण रा. योगेश नगर, जिरेवाडी ता. परळी जि. बीड 2) भैय्यसाहेब रानबा आदोडे रा. भिमवाडी, जुने रेल्वे स्टेशन, परळी ता. परळी जि. बीड 3) अमोल बालासाहेब कटारे रा. उमरी ता. जि. परभणी
21) लवाद अर्ज क्र. 727/2024 1) कमलबाई रेखा राठोड रा. प्राथमिक आश्रम शाळा, लेंडेवाडी ता. परळी दुसरा पत्ता : रा. सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी 2) त्रिंबक मेघाजी चव्हाण रा. इंदिरा नगर, लेंडेवाडी ता. परळी 3) सुभाष देवराव राठोड रा. लेंडेवाडी ता. परळी जि. बीड
22) लवाद अर्ज क्र. 728/2024 1) संतोष रामभाऊ गायकवाड रा. श्रीकृष्ण नगर, गंगाखेड ता. गंगाखेड 2) चंद्रकांत बालासाहेब सातपुते रा. वंदना भुमी, कोदरी रोड, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी 3) भारत दत्ताराव हत्तीअंबिरे रा. फुले नगर, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी
23) लवाद अर्ज क्र. 729/2024 1) अनिल देवचंद कोंढारे रा. निमगाव मायंबा ता. जि. बीड 2) प्रसाद शिवराम कराड रा. लिंबोटा ता. परळी जि. बीड 3) चंद्रकला भास्करराव केकान रा. विठ्ठल हॉस्पीटल जवळ, चऱ्हाटा फाटा, बीड ता. जि. बीड
24) क्र. 730/2024 रामभाऊ सिताराम जईद रा. घारे कॉलनी, मंठा ता. मंठा जि. जालना, विष्णु सिताराम खराबे यांच्या कर्जाला जामीनदार
25) लवाद अर्ज क्र. 731/2024 1) प्रकाश दत्तात्रय वाव्हळे रा. घारे कॉलनी, मंठा ता. मंठा जि. जालना 2) प्रमोद काशिनाथ साळवे रा. केसापुरी पो. फुले पिंपळगाव ता. माजलगाव 3) दयानंद उत्तमराव खोपे रा. साई नगरी, नवीन वसाहत, भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड
26) लवाद अर्ज क्र. 734/2024 1) सुशिल रामभाऊ बुद्रे 2) रमेश रामभाऊ बुद्रे 3) आकाश तानाजीराव पुजारी 4) उमाकांत शंकरअप्पा बुद्रे रा. सर्व. नांदुर वेस, परळी ता. परळी जि. बीड
27) लवाद अर्ज क्र. 735/2024 1) शिवकुमार गोविंदअप्पा व्यवहारे 2) सुनिता शिवकुमार व्यवहारे 3) कृष्णा शिवकुमार व्यवहारे 4) रमेश लिंबाजीअप्पा सपाटे रा. सर्व. गांधी मार्केट, परळी ता. परळी जि. बीड
28)736/2024 1)अंगद किसनराव नाईकनवरे 2)शिवाजी भागवत नाईकनवरे 3) सुग्रीव किसनराव नाईकनवरे रा. सावरगाव ता. माजलगाव
(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 26/12/2024 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

अॅड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

# कॅबिनेटपासून राज्यमंत्रीपर्यंत... फडणवीसांची नवी टीम

## भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीच्या मंत्र्यांची संपूर्ण यादी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबर नागपूरमधील राजभवन येथे संपन्न झाला. महायुती सरकारमध्ये एकूण ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. नागपूर येथील राजभवनवर राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्वच मंत्र्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये रविवारी एकाचवेळी ३३ कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्र्यांना शपथ देण्यात आली. भाजपचे १९, शिवसेना शिंदे गटाकडून ११ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून ९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळात ४२ मंत्री झाले आहेत. तर सध्या एक मंत्रिपद रिक्त ठेवण्यात आले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीकडून कोणत्या आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली, संपूर्ण यादी....मंत्रिपदाची शपथ घेणारे मंत्री–

**● कॅबिनेटमंत्री**

1. चंद्रशेखर बावनकुळे
२. राधाकृष्ण विखेपाटील
3. हसन मुश्रीफ
४. चंद्रकांत पाटील
५. गिरीश महाजन
६. गुलाबराव पाटील
७. गणेश नाईक
८. दादा भुसे
९. संजय राठोड
10. धनंजय मुंडे
11. मंगलप्रभात लोढा
12. उदय सामंत
13. जयकुमार रावळ
14. पंकजा मुंडे
15. अतुल सावे
16. अशोक उईके
१७. शंभूराज देसाई
१८. आशिष शेलार
१९. दत्ता भरणे
२०. आदिती तटकरे
२१. शिवेंद्रसिंह भोसले
२२. माणिकराव कोकाटे
२३. जयकुमार गोरे
२४. नरहरी झिरवळ
२५. संजय सावकारे
२६. संजय शिरसाठ
२७. प्रताप सरनाईक
२८. भरत गोगावले
२९. मकरंद पाटील
30. नितेश राणे
31. आकाश फुंडकर
32. बाबासाहेब पाटील
33. प्रकाश आबिटकर

▶▶ उर्वरित पान २ वर

## भुजबळ साहेबांना मंत्री मंडळातून वगळले ओबीसी समाज चिडला

### माजलगाव पाथरी रोडवर आज रास्ता रोको

### ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे संतोष रासवे यांचे आव्हान

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी चे नेते आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्री मंडळातून वगळण्यात आल्याने महाराष्ट्रातील तमाम ओबीसीच्या मनात चीड निर्माण झाली आहे संतोष निर्माण झाला आहे याचाच निषेध म्हणून माजलगाव पाथरी रोडवर आज सकाळी १० वाजता रास्ता रोको करून शासनाचा निषेध व्यक्त केला जाणार आहे तरी रास्ता रोको मध्ये मोठ्या संख्येने ओबीसी बांधवांनी सहभागी व्हावे असे आव्हान संतोष रासवे यांनी केले आहे



माजलगाव तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे सकल ओबीसीच्या आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात झुंज दिली आहे आणि ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवण्याचे काम केले आहे भुजबळ साहेब सतत ओबीसींच्या हक्कासाठी न्यायासाठी झगडत असतात म्हणूनच माहिती सरकारकडून भुजबळ साहेबांना हिनतेची वागणूक देऊन मंत्री मंडळातून वगळले गेले व अपमानित केले गेले यामुळे महाराष्ट्राच्या तमाम ओबीसी बांधवांवर हा एक प्रकारे शासनाने केलेला अन्याय च आहे यामुळे महाराष्ट्रातील सकल ओबीसी समाज नाराज झाला असून ओबीसी समाजामध्ये शासनविरोधी चीड व असंतोष

▶▶ उर्वरित पान २ वर

## आतापर्यंत २५ हजार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी; जिल्ह्यात नाफेडची 30 खरेदी केंद्रे

### ७६ हजार क्विंटल खरेदी; शेतकऱ्यांनी अडचण आल्यास संपर्क करावा : संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

सोयाबीनच्या भावात सुधारणा होईल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती मात्र गेल्या काही वर्षांत सोयाबीनचा खाजगी बाजारातील भाव काही वाढता वाढेना झालाय. काही शेतकऱ्यांकडे २ ते ३ वर्षांपासून सोयाबीन साठवून ठेवलेले आहे. सध्या खाजगी बाजारात शेतकऱ्यांना ४ हजारांच्या आसपास सोयाबीनला दर मिळत आहे. शेतकऱ्यांचे सोयाबीन काढणीला आले असताना यावर्षी तरी भाव उचल खाईल असे वाटले होते मात्र तसे काही महिने कालावधी उलटला



असताना देखील अद्याप पर्यंत झालेले नाही. यामुळे शेतकऱ्यांनी नाफेडच्या खरेदी केंद्रात ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सोयाबीन विक्रीस प्राधान्य दिले असून आतापर्यंत २५ हजार ५२० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. नाफेड कडून संपूर्ण जिल्ह्यात ७६ हजार क्विंटल खरेदी देखील झालेली असल्याची माहिती पणन विभागाकडून उपलब्ध झालेली आहे. जिल्हाभरात ३० तर बीड तालुक्यात ३ खरेदी केंद्राच्या माध्यमातून सध्या नाफेडद्वारे सोयाबिन खरेदी सुरु आहे. सोयाबीन विक्री करतेवेळी शेतकऱ्यांनी काही अडचण आल्यास संपर्क करावा असे आवाहन छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती, बीडचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

## आष्टीत स्टेट बँक समोर शेख हारूण शेख युन्नूस यांचे जागा ताबा व किरायाची रक्कम मिळत नसल्याने आमरण उपोषण

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे स्टेट बँक ऑफ इंडिया २४८३ या शाखेसमोर शेख हारूण व शेख युनूस शेख जाफर हे सोमवार दि. १६ डिसेंबर रोजी आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या मालकीच्या भाडेतत्त्वावर असलेल्या आष्टी शहरातील मेन बाजार पेठेत स्टेट बँकेच्या स्थलांतरित झालेल्या जागा ताबा व किरायाची रक्कम मिळत नसल्याने उपोषणास बसले असून जोपर्यंत आमचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरू राहणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी यावेळेस सांगितले.




यावेळी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,कसबे आष्टी नगर पंचायत हद्दीत आमचे मालकी व ताब्यात मिळकत क्रं. १११६ शहर भुमापन क्र. १८०५ एकुण क्षेत्र २५५० चौ. फुट जागा असुन सदर जागा आपले बँकेने आम चेकडून दिं. ०१/०४/२०१६ ते ०१/०४/२०२१ या कालावधीपर्यंत किरायाने घेतली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये बँकेने स्थलांतर करून दुसऱ्या जागेत बँक सुरू केली आहे, मात्र स्थलांतर करत असतांना संबंधीत शाखाधिकाऱ्याने रितसर आमचे जागेचा रिक्त ताबा आम्ळास दिला नसुन सदर जागेस बँकेने कुलूप लावुन अनाधिकृतपणे आमचे जागेवर ताबा केला आहे. बँक स्थलांतरी झालेवर आम्ही वारंवार आपणांशी तसेच संबंधित शाखाधिकाऱ्यांशी संपर्क करून आमचे जागेचा रिक्त ताबा आम्हास

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती गंभीर!

### लोकशाहीचा अस्त आणि हुकूमशाहीचा उदय झालाय का? जनतेसमोर मोठा प्रश्न : राजेभाऊ फड

**परळी । प्रतिनिधी**

गुंडगिरी, दादागिरी, चोऱ्या, माऱ्या, हत्या आणि अपहरण अशा गोष्टी बीड जिल्ह्यात नित्याच्याच झाल्या आहेत. जिल्हाभरात रोजच काही ना काही अप्रिय घटना घडत आहेत. अपप्रवृत्तीच्या धेंडांना कायद्याची आणि पोलीस यंत्रणेची अजिबात भीती राहिलेली नाही. अत्यंत सुसंस्कृत जिल्हा असलेल्या बीड जिल्ह्याची वाईट अवस्था मागील काही दिवसांत होऊन बसली आहे. येथील लोकशाही संपुष्टात आली असून गुंडगिरी आणि दादागिरीचा उदय झालेला पहायला मिळत आहे. ही स्थिती गंभीर आणि भीतीदायक



असून, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत व्हावी यासाठी ठोस उपाययोजना शासन आणि प्रशासनाकडून केल्या जाणे अत्यंत आवश्यक असून, नवनियुक्त मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष केंद्रित करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस

▶▶ उर्वरित पान २ वर

## नियमबाह्य नियुक्ती करणाऱ्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला निलंबित करण्याची दिव्यांग संघटनेची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

नियमबाह्य कामकाज करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करून निलंबित करण्याची दिव्यांग कर्मचारी संघटनेने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे.

बीड जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व प्रशासकीय विभागांपैकी सामान्य प्रशासन विभाग प्रशासनाच्या केंद्रस्थानी असून या विभागातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी प्रशासनीक कामकाज करतांना न्यायनिर्णय, शासन निर्णय, शासन परिपत्रके व धोरणात्मक प्रशासकीय निर्णयाचे अनुपालन करून कामकाज करणे अपेक्षित आहे. असे कामकाज केल्याने जिल्हा परिषद अंतर्गत कामानिमित्त येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांचे व कार्यरत कर्मचाऱ्यांचे हितरक्षण होवू शकते. तथापि असतांनाही जिल्हा परिषदेअंतर्गत सामान्य प्रशासन विभागात कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे नियमबाह्य कामकाज करण्यास अग्रेसर राहून शासकीय नियमांची पायमल्ली करतात व नियुक्ती प्राधिकाऱ्याची दिशाभूल करतात. याचा प्रत्यय शासन मान्यताप्राप्त.दिव्यांग कर्मचारी संघटनेस आला आहे. बीड जिल्हा परिषदेतील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यास विलंब केल्याप्रकरणी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी काही कर्मचाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केले होते. यामध्ये दिव्यांग कनिष्ठ. प्रशासन अधिकाऱ्याचाही समावेश होता. परंतु निलंबनानंतर पुर्नस्थापित करताना शासनाच्या दि.२० एप्रिल २०१३ च्या परिपत्रकातील तरतुदी विचारात घेता पुर्नस्थापित करताना जिल्हा संवर्गातील कर्मचाऱ्यांना मुख्यालयाबाहेर इतर तालुक्याच्या कार्यालयात पुर्नस्थापित करणे बंधनकारक आहे. परंतु उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची दिशाभूल करुन स्वत:च्या स्वाक्षरीने आदेश निर्गमित करून वरिष्ठ. सहायकपदी कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यास जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात नियुक्ती दिली. दिव्यांग कनिष्ठ. प्रशासन अधिकारी यांना गेवराई येथे पुर्नस्थापित केले. या प्रकरणी दि.२०/०४/२०१३ रोजीच्या शासकीय परिपत्रकातील तरतुदी माहित असतांनाही सुदृढ कर्मचाऱ्यांना एक न्याय व दिव्यांग कर्मचाऱ्यावर अन्याय या स्वरुपाची कार्यपद्धती अंमलात आणुन शासकीय परिपत्रकातील तरतुदी समान न्याय व नैसर्गिक न्याय तत्त्वाची पायमल्ली झाल्याची तक्रार शासन मान्यताप्राप्त. राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी विभागीय आयुक्तांकडे दि. ०२ सप्टेंबर २०२४ रोजी केली होती.




## थोडक्यात

### सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच !

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी येथे आंबेडकरी आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या संपूर्ण शरीरावर मारहाणीच्या खुणा स्पष्टपणे दिसत असल्याचे अहवालात म्हटले आहे. संविधानाची विटंबना झाल्याने परभणी शहरात आंबेडकरी जनतेने निषेध आंदोलन केले. यामध्ये पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांवर लाठीचार्ज केला. अनेक निरपराध तरुणांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली. यामध्ये सूर्यवंशी यांचा समावेश होता. त्यांचा रविवारी (दि.१५) पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर परभणी शहरात दाखल झाले आहेत. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टम ऑन कॅमेरा करावा अशी मागणी केली होती. तसेच सूर्यवंशी यांना आम्ही न्याय मिळवून देऊ. त्यांच्या न्यायासाठी लढा देणार असल्याचेही ॲड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.



### लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (Arbitrator Pancl) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग डव्होकेटेस, चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, राष्ट्रीय बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात. त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत (Biack List) मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो.

### मोटरसायकल चोरांची टोळी जेरबंद : १९ दुचाकी स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत सापळा लावून मोटारसायकल चोरांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला. यावेळी चोरट्यांकडून १९ मोटारसायकलसह जवळपास ९ लाख मुद्देमाल जप्त केला. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल वीरसिंग शेरसिंग गोके ,रा. सा.बां.कार्यालय जवळ, सदर बाजार रोड, अंबाजोगाई याने चोरली असून तो चोरीच्या गाड्या विक्री करण्यासाठी चनई रोडवरील सीताफळ संशोधन केंद्राजवळ येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरिक्षक उस्मान शेख यांनी त्या परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या वीरसिंगला पोलिसांनी पाठलाग करून पकडला. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने घरात लपवलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांना दाखवल्या. तसेच, त्याने गाडी विकताना फायनान्सची असल्याचे कारण भासवुन कागदपत्र नंतर देतो असे सांगत आठ मोटारसायकल विकल्या होत्या. पोलिसांनी या सर्व १८ मोटारसायकल जप्त केल्या. पोलीस वीरसिंगच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली,पोलिस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस कर्मचारी मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे व चालक नितीन वडमारे यांनी केली.